**अपंग व्यक्ती (समान संधी संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम १९९५ नुसार राजभवन कार्यालयाच्या आस्थापनेवरील पदांवर शारिरीकदृष्टया अपंगांसाठी केंद्र शासनाने अपंगांच्या पदनिश्चितीबाबत प्रसिद्ध केलेल्या यादीनुसार सुयोग्य पदे निश्चित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,

शासन निर्णय, क्रमांक :आरएजे-१०११/७७०/प्र.क्र.९/११/२०-अ,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : **१३.०१.२०११**

वाचा :- (१) अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम, १९९५, (क्र.१/१९९६)

(२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.१२/ ९७/ १६ -अ, दिनांक २.५.१९९८.

(३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या शासन निर्णय क्रमांक-न्यायाप्र-२००९/प्र.क.५/ सुधार-३, दिनांक ३.८.२०१०

(४) या विभागाचा शासन निर्णय क्रमांक संकीर्ण -१००५/३८०/प्र.क्र.३४/२००५/२०-अ, दिनांक २.२.२००९

**प्रस्तावना :-**

अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम, १९९५ (१९९६ चा क्रमांक १) अन्वये अपंगांच्या सर्वांगिण विकासासाठी व त्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी शासन सेवेत ३ टक्के पदे आरक्षित करण्याची तरतूद आहे. त्यानुसार या विभागाच्या अखत्यारितील राजभवन कार्यालया अंतर्गत राज्यपाल सचिव कार्यालय तसेच राज्यपाल परिवार प्रबंधक कार्यालयाच्या आस्थापनेवरील गट-अ, ब, क व गट-ड मधील पदांवर शारीरिकदृष्ट्या अपंगांसाठी आरक्षण ठेवण्याकरिता संदर्भ क्रमांक ४ येथील दिनांक २.२.२००९ च्या शासन निर्णयानुसार पदनिश्चिती करण्यात आलेली आहे.

२ शासनाच्या विविध विभागांमार्फत अपंगांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदांच्या पदनिश्चितीमध्ये एकवाक्यता नाही किंवा ती परिपूर्ण नाही, यासाठी अपंग व्यक्तींसाठी सुधारित पद निश्चिती करणे व त्या अनुषंगाने अपंगांची राखीव पदे भरणे या संदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्रमांक २२५/२००९ दाखल करण्यात आली आहे. या याचिकेसंदर्भात मा. उच्च न्यायालयाने शासकीय व निमशासकीय सेवेतील पदे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार अपंगांसाठी सुनिश्चित करणेबाबतचे निदेश दिले आहेत.त्यास अनुसरुन संदर्भ क्रमांक ३ येथील दिनांक ३.८.२०१० च्या शासन निर्णयान्वये सूचित केल्याप्रमाणे या विभागाच्या अखत्यारितील राजभवन कार्यालयांतर्गत राज्यपाल सचिव कार्यालय तसेच राज्यपाल परिवार प्रबंधक कार्यालयाच्या आस्थापनेवरील पदे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना तसेच अपंगांच्या पदनिश्चितीबाबत प्रसिद्ध करण्यात आलेल्या यादीनुसार अपंगांसाठी सुनिश्चित करण्यात करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय :-**

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या जनहित याचिका क्रमांक २२५/२००९ संदर्भात शासकीय व निमशासकीय सेवेतील पदे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार अपंगांसाठी सुनिश्चित करणेबाबतचे

निदेश दिले असल्याने उपरोक्त संदर्भाधीन क्रमांक ४ येथील दिनांक २.२.२००९ चा शासन निर्णय या शासन निर्णयाच्या परिशिष्ट -'अ' व 'ब' येथे नमूद पदांकरिता रद्द करण्यात आल्याचे समजण्यात यावे .

२. संदर्भ क्रमांक ३ येथील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक ३.८.२०१० च्या शासन निर्णयानुसार सूचित केल्याप्रमाणे राज्यपाल सचिव कार्यालय व राज्यपाल परिवार प्रबंधक कार्यालयाच्या आस्थापनेवरील अ, ब, क, व ड गटातील कोणत्या पदासाठी कोणत्या वर्गवारीतील अपंग व्यक्तीसाठी आरक्षण ठेवावे याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

१. अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम, १९९५ (१९९६ चा क्रमांक १) या अधिनियमातील कलम ३२ व ३३ नुसार राज्यपाल सचिव कार्यालय व राज्यपाल परिवार प्रबंधक कार्यालयाच्याआस्थापनेवरील पदांवर या शासन निर्णयाच्या परिशिष्ट- 'अ' व 'ब' मध्ये नमूद केल्याप्रमाणे अपंगत्वाचे प्रमाण किमान ४० टक्के असलेल्या अपंग व्यक्तींना ३ टक्के पर्यंत फक्त सरळसेवा भरतीमध्ये आरक्षण ठेवण्यात यावे.

२. विहित मार्गाने सरळसेवा भरतीने भरावयाच्या पदांकरिता अपंग उमेदवारांसाठी शारिरीक पात्रतेचे निकष सोबतच्या परिशिष्ट -'अ' व 'ब' प्रमाणे असतील. विहित मार्गाने उमेदवारांची शिफारस प्राप्त झाल्यानंतर, अशा उमेदवारांस शारिरीक पात्रतेसंदर्भात, संबंधीत विषयाच्या तज्ञांचा समावेश असलेल्या वैद्यकीय मंडळाने प्रमाणित केल्यानंतरच, अशा अपंग व्यक्तींची शासन सेवेत संबंधीत संवर्गात खाली दर्शविलेले निकष विचारात घेऊन नियुक्ती करण्यात येईल.

अ) संबंधीत पदांच्या सेवाप्रवेश नियमातील तरतूदीनुसार अर्हताधारक असेल तर.

ब) त्या त्या संवर्गातील कर्तव्ये व जबाबदा-या लक्षात घेऊन त्याप्रमाणे वैद्यकीय मंडळाने सक्षम ठरविल्यास.

क) पदोन्नतीच्या पदास व एकाकी पदास अपंगांचे आरक्षण लागू नाही.

३. अपंग व्यक्तींना शासकीय नियुक्तीकरिता योग्य ठरविलेल्या पदांवर सरळसेवेने नियुक्ती देणेबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही -१०९९/प्र.क्र.३७/९९/१६-अ, दिनांक ४.३.२००२ नुसार क्रमवार बिंदूनामावली व कार्यपद्धती विहित करण्यात आलेली आहे.

४ सदर आदेश सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या संदर्भ क्रमांक ३ येथील शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०११०११३२०३३१६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

**(वि.द शिंदे)**

**अवर सचिव महाराष्ट्र शासन**

सोबत- परिशिष्ट -'अ' व 'ब'

प्रत :- १.महालेखापाल, महाराष्ट्र-१, ( लेखा व अनुज्ञेयता ) / ( लेखा परिक्षा ), मुंबई.

२.महालेखापाल, महाराष्ट्र-२, ( लेखा व अनुज्ञेयता ) / ( लेखा परिक्षा ), नागपूर.

३ राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
४.राज्यपालांचे परिवार प्रबंधक, राजभवन, मुंबई.
५.महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
६.सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन १९/१९-अ, मंत्रालय, मुंबई.
७.सामाजिक न्याय सांस्कृतीक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग/सुधार-३, मंत्रालय, मुंबई. ( ५ प्रती )
८.सह सचिव, (सेवा) / उप सचिव (प्रशासन/कार्यासन-१९), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१०.निवड नस्ती (२ प्रती)

शासन निर्णय क्रमांक आरएजे-२०११/७७०/प्र.क्र.०९/११/२०-अ, दिनांक १३/४/२०११ सोबतचे परिशिष्ट - "अ"

राज्यपाल सचिव कार्यालय

| अ. क्र. | पदाचे नाव | शारिरीक योग्यता | सुयोग्य पदासाठी अपंगत्वाची वर्गवारी |
|---|---|---|---|
| | | **राजपत्रित-वर्ग-अ** | |
| १ | राज्यपालांचे सचिव (भा.प्र.से.संवर्ग) | | संवर्ग पद |
| २ | सह-सचिव(वै.वि.मं.)(भा.प्र.से.,संवर्ग) | | संवर्ग पद |
| ३ | खाजगी सचिव(१)/खासगी सचिव (२) | S.ST.BN.MF.RW | OL BL OA B LV |
| ४ | लघुलेखक (निवडश्रेणी) | S.ST.BN.MF.RW | OL BL OA B LV |
| | | **राजपत्रित-वर्ग-ब** | |
| ५ | संशोधन अधिकारी | S.W.SE.ST.RW | OA OL HH B LV |
| ६ | लेखा अधिकारी (म.वि.व.ले.से.सं) | S.B.N.SE.RW.MF.H.C | BL OA OL HH |
| ७ | अधिक्षक (प्रशासन) | S.RW.SE.MW.C | OL OA BL HH B LV |
| ८ | अधिक्षक (शिक्षण) | S.RW.SE.MW.C | OL OA BL HH B LV |
| | | **अराजपत्रित-वर्ग-ब** | |
| ९ | लघुलेखक (उच्च श्रेणी) | ------- | B/LV |
| १० | लघुलेखक (उच्च श्रेणी) (वै.वि.म.) | ------- | B/LV |
| ११ | सहाय्यक लेखाधिकारी (वै.वि.म.)(म.वि.व.ले.से. संवर्ग) | S.B.N.SE.RW.MF.H.C | BL OA OL HH |
| | | **वर्ग -क** | |
| १२ | लघुटंकलेखक | S.S.T.W.L.MF.SE.RW.H.C | OA OL BL OAL B LV |
| १३ | दूरध्वनी चालक | S.ST.W.MF.SE.H.C | OA OL BL B LV |
| १४ | लिपिक | S.ST.W.MF.SE.RW.H. | OA OL OAL BL B LV HH |

| | | | |
|---|---|---|---|
| १५ | [illegible] | S.ST.W.L.MF.SE.RW.H.C | OA OL BL OAL B LV |
| १६ | लिपिक टंकलेखक (मराठी) | S.ST.W.L.MF.SE.RW.H.C | OA OL BL OAL B LV |
| १७ | लिपिक टंकलेखक(व.वि.म.) | S.ST.W.L.MF.SF.RW.H.C | OA OL BL OAL B LV |
| १८ | वाहन चालक | | लागू नाही |
| १९ | वाहनचालक (व.वि.म.) | | लागू नाही |
| | | वर्ग-ड | |
| २० | दफ्तरी | S.ST.W.MF.SE | OL OA HH LV B |
| २१ | रोनीओ चालक | S.W.SE | HH LV |
| २२ | शिपाई | S.ST.W.F.PP.L.KC.B.SE.H | OL HH LV / B |
| २३ | संदेशवाहक | S.ST.W.F.PP.L.KC.B.SE.H.RW | OA OL HH LV / B |

शासन निर्णय क्रमांक आरएजे-२०११/७७०/प्र.क्र.०९/११/२०-अ, दिनांक १३/१/२०११ सोबतचे परिशिष्ट - "ब"

राज्यपालांचे परिवार प्रबंधक कार्यालय

| अ.क्र. | पदाचे नाव | शारिरीक योग्यता | सुयोग्य पदासाठी अपंगत्वाची वर्गवारी |
|---|---|---|---|
| | **राजपत्रित वर्ग- अ** | | |
| १ | मा.राज्यपालांचे भिषक | S.ST.H.W.RW.SE | OL OA |
| | **राजपत्रित वर्ग -ब** | | |
| २ | अधीक्षक | S.RW.SE.MW.C | OL OA BL HH B LV |
| ३ | खाद्यपेय अधीक्षक | MF.S.H.RW.ST.W.C | OA OL BL LV HH |
| | **अराजपत्रित वर्ग- ब** | | |
| ४ | सहाय्यक अधीक्षक व लेखापाल | S.B.N.SE.RW.MF.H.C | BL OA OL HH |
| | **वर्ग- क** | | |
| ५ | परिचारिका | S.ST.W.MF.SE.RW.H.C | OL |
| ६ | औषधनिर्माता | S.ST.W.BN.L.MF.SE.R.W.H.C | OL BL |
| ७ | लघुटंकलेखक | S.S.T.W.L.MF.SE.RW.H.C | OA OL BL OAL B.LV |
| ८ | लिपिक | S.ST.W.MF.SE.RW.H. | OA OL OAL BL B LV HH |
| ९ | लिपिक - टंकलेखक (मराठी) | S.ST.W.L.MF.SE.RW.H.C | OA OL BL OAL B LV |
| १० | वाहन चालक | | लागू नाही |
| | **वर्ग- ड** | | |
| ११ | आचारी | S.ST.W.F.PP.L.B | BL OL B LV |
| १२ | प्रमुख बटलर | S.ST.W.MF.SE.RW.H | OL HH LV |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | शिंपी (सज्जा साहित्य) | S.ST.MF.SE | OL BL MW HH |
| १४ | दफ्तरी | S.ST.W.MF.SE | OA OL HH LV B |
| १५ | शिपाई | S.ST.W.F.PP.L.KC.B.SE.H | OL HH LV/B |
| १६ | संदशवाहक | S.ST.W.F.PP.L.KC.B.SE.H.RW | OA OL HH LV / B |
| १७ | सहाय्यक आचारी | S.ST.W.MF.SE.H | OL HH LV |
| १८ | बटलर | S.ST.W.MF.SE.RW.H | OL HH LV |
| १९ | पॅंट्री मॅन | ST.PP.SE.BN.MF.L.C | OL HH LV |
| २० | स्टोअर किपर | S.ST.W.L.PP.MS.SE.RW | OA OL HH |
| २१ | प्लेट वॉशर | S.ST.W.L.PP.BN.MF | BL OL HH LV/B |
| २२ | व्रणोपचारक | S,ST,F,PP,B,SE,H,RW | OL HH |
| २३ | माळी | S.ST.W.F.PP.L.KC.B.SE | OL HH LV |
| २४ | मोटार स्वच्छक | S.ST.MF.SE | OA OL HH |
| २५ | लष्कर | S.W.SE | OL OA LV HH |
| २६ | सफाईगार | S.ST.W.F.PP.L.KC.B.SE.H | OL HH LV |
| २७ | धोबी | S.ST.KC.F.PP.L.F.SE | OL OA HH B LV |
| २८ | शिंपी (लिनन) | S.ST.MF.SE | OL BL MW HH |
| २९ | शिंपी | S.ST.MF.SE | OL BL MW HH |

**ABBREVIATIONS USED** : S=Sitting, BN=Bending, SE=Seeing, RW=Reading & Writing,C=Communication, MF=Manipulation by Fingers, PP=Pulling & Pushing, L=Lifting, KC=Kneeling & Croutching, ST=Standing, W=Walking, BLA=Both Legs & Arms, BA=Both Arms,OL=One Leg, BL=Both Leg, OA=One Arm, OAL=One Arm and One Leg, B=Blind, LV=Low Vision, H=Hearing, MW=Muscular Weakness

OH= Orthopaedically Handicapped, CP= Cerebral Palsy, LC= Leprosy Cured, VH= Visually Handicapped, HH= Hearing Handicapped